प्रेसनोट दिनांक २२/०२/२०२४

# सराईत गुन्हेगाराकडून, ०५ मोटारसायकल हस्तगत, शहर गुन्हे शाखेची कामगिरी.

सोलापूर शहरामधील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणे बाबत, श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर यांनी, गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन केले होते.

अ) त्याप्रमाणे, गुन्हे शाखेकडील **सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास** पथक यांनी, सोलापूर शहरात दाखल मोटार सायकल चोरीचे गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करुन, गुन्ह्याचे घटनास्थळी मिळून आलेल्या तांत्रिक माहितीचे विश्लेषण केले. त्या तांत्रिक विश्लेषणाचे आधारे तसेच मिळालेल्या बातमीच्या माहितीवरून, सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकाने, दि.१९/०२/२०२४ रोजी पोटफाडी चौक, सोलापूर येथे इसम नामे- इम्रान सलिम मडकी, वय-३२ वर्ष, रा. प्लॉट नंबर १७, अन्सारी चौक, शास्त्री नगर, सोलापूर यास ताब्यात घेवून, त्याचेकडील मोटार सायकल बाबत तपास केला असता, ती मोटार सायकल ही, **एम आय डी सी पोलीस स्टेशन गु.र.नं.४७/२०२४ भादवि ३७९** मधील चोरीस गेलेली मोटार सायकल असल्याचे निष्पन्न झाल्याने, सदरची मोटार सायकल जप्त करून, सदरचा गुन्हा उघडकीस आला आहे.

ब) तसेच दि.२०/०२/२०२४ रोजी, मिळालेल्या बातमीवरून, **सराईत मोटर सायकल चोर- उमेश नागनाथ भोसले** वय-२६ वर्ष, रा.घर नंबर बी - ११, भगवान नगर, झोपडपट्टी सोलापूर यास ताब्यात घेऊन, त्याचेकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, त्याने खालील प्रमाणे ०४ मोटर सायकल काढून दिल्याने त्या हस्तगत केल्या आहेत.

**अशा प्रकारे, वरील नमुद दोन्ही आरोपींकडुन १,८०,०००/- रूपये किंमतीचे एकुण ०५ मोटार सायकल हस्तगत करून, खालील प्रमाणे ०५ गुन्हे उघडकीस आले आहेत.**

| अ. क्र | पोलीस स्टेशन | गु.र.नं. व कलम | मुद्देमाल वर्णन | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | एम आय डी सी | ४७/२०२४भादवि ३७९ | MH13CL3034 | एच एफ डिलक्स | चेसी क्रमांक - MBLHA11AZG9F03718<br>इंजिन क्रमांक - HA11EKG9F03609 |
| २ | सदर बझार | ११२/२४ भादवि ३७९ | MH13 AU 8909 | पॅशन प्रो | चेसी क्रमांक - MBLHA10EWBGE04123<br>इंजिन क्रमांक - HA10EDBGD33617 |
| ३ | विजापूर नाका | ६६/२४ भादवि ३७९ | MH13 DB 1953 | स्प्लेंन्डर | चेसी क्रमांक - MBLHAR07XJHE45773<br>इंजिन क्रमांक - HA10AGJHEC3321 |
| ४ | जेलरोड | ६८/२४ भादवि ३७९ | MH13CV8786 | २२० पल्सर | चेसी क्रमांक - MD2A13EY4HCA32250<br>इंजिन क्रमांक - DKYCHA10511 |
| ५ | पांगरी, सोलापूर ग्रा. | ०४/२४ भादवि ३७९ | MH13BW4665, | होन्डा ड्रीम न्यु | चेसी क्रमांक - ME4JC623MDT028586<br>इंजिन क्रमांक - JC62ET1028790 |

सदरची कामगिरी मा. श्री. एम.राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे सहा.पोलीस आयुक्त, श्री.सुनिल दोरगे, व.पो.नि., गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, स.पो.नि./संजय क्षिरसागर, पोलीस अंमलदार अनिल जाधव, महेश शिंदे, राजु मुदगल, कुमार शेळके, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, प्रकाश गायकवाड, सतिश काटे, बाळु काळे यांनी केली आहे.

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर
यांचे करीता.

Scanned with CamScanner